# बृहन्मुंबई महानगरपालिका

## अर्थसंकल्पीय अंदाज २०११-२०१२ - ठळक वैशिष्टये

**महानगरपालिकेची आर्थिक स्थिती :-**

- बृहन्मुंबई महानगरपालिकेचा अर्थसंकल्प तुटीचा असता कामा नये. महानगरपालिकेला आपला सर्व महसुली व भांडवली खर्च, महसुली प्राप्ती आणि कर्जफेडीची अविरत क्षमता असलेल्या कर्ज उभारणीमधून भागविता आला पाहिजे.

- अलिकडच्या काळात अर्थसंकल्प 'अ' अंतर्गतचा भांडवली खर्च हा विविध प्रकारे वाढलेला असल्याने महसुली अर्थसंकल्पामध्ये सुधारणा, आणि / किंवा महसुलाचे नवीन साधनस्त्रोत समाविष्ट केल्याखेरीज तो भागविता येणे शक्य नाही. उदाहरणादाखल अर्थसंकल्प अ, ब आणि ई अंतर्गतचा सन २००७-०८ मधील रु.१३८६ कोटी इतका भांडवली खर्च दोन वर्षाच्या अल्प कालावधीमध्ये वाढून तो सन २००९-१० मध्ये रु.३४६२ कोटी इतका झाला आहे.

- सन २००७-०८, २००८-०९ आणि २००९-१० मध्ये आस्थापना खर्च केवळ महसुली उत्पन्नाच्या अनुक्रमे ४३.२३%, ३९.८३% आणि ४५.४७% इतका होता. मात्र तो आता सन २०११-१२ मध्ये ५९.९०% इतका अंदाजित केला आहे. सन २०११-१२ आणि २०१२-१३ मध्ये वेतनश्रेण्यांच्या सुधारणेपोटीची वाढीव रक्कम आणि मागील वर्षांची द्यावयाची थकबाकी या रकमांचा देखील समावेश करावा लागणार आहे. परिणामी, सन २०११-१२ आणि नंतरच्या वर्षामधील महसुली वर्ताळा खूपच कमी राहणार आहे. यामुळे पायाभूत सुविधांवरील खर्च तसेच महानगरपालिका प्रतिवर्षी उभारीत असलेल्या कर्जाच्या मर्यादेवर मोठा ताण पडणार आहे.

- अपूर्ण असलेली कामे पूर्ण झाल्यानंतर त्यांच्याबाबतीत अगोदर झालेला खर्च हा फायदेशीर ठरावा म्हणून अशा कामांसाठी जास्त प्रमाणात तरतुदी प्रस्ताविल्यामुळे येत्या आर्थिक वर्षामध्ये भांडवली कामांच्या खर्चासाठी वाढीव कर्ज घेण्याची गरज निर्माण.

- सन २०१०-११ साठी रु.१६९६२.१० कोटीचे सुधारित अंदाज. सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजाचे आकारमान रु.२१०९६.५६ कोटी जे सन २०१०-११ पेक्षा २४.३७ टक्क्यांनी जास्त.

- भांडवली खर्च सुधारित केल्यामुळे कमी झालेले दायित्व व भांडवली कामांसाठी उपलब्ध होणारा महसुली वर्ताळा यामुळे सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात नमूद करण्यात आलेले रु.३००० कोटी इतके अंतर्गत कर्ज यावर्षी उभारण्याची गरज भासणार नाही.
- अर्थसंकल्प अ, ब आणि ई अंतर्गत सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजानुसार रु.८६९.८६ कोटी एवढा महसुली वर्ताळा अंदाजित.
- सन २०११-१२ चा भांडवली खर्च भागविण्याकरिता अर्थसंकल्प 'अ' करिता महापालिकेच्या अंतर्गत निधीतून रु.२००० कोटी एवढया रकमेचे अंतर्गत कर्ज घेण्याचे प्रस्तावित.

**अर्थसंकल्पीय उद्दिष्टे :**

- सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये कोणत्याही प्रकारचे नवीन कर अथवा विद्यमान करांच्या दरात वाढ प्रस्तावित नाही.
- बृहन्मुंबई महानगरपालिका शाळांतील शिक्षणाचा दर्जा उंचावण्याच्या दृष्टीकोनातून शाळा सुधार प्रकल्पासाठी रु.४८.२९ कोटीची तरतूद. सदर प्रकल्पात युनिसेफचे तांत्रिक सहकार्य, हा प्रकल्प मराठी, हिंदी, उर्दू आणि इंग्रजी माध्यमाच्या ९१३ प्राथमिक शाळांमध्ये राबविला जाणार.
- १४४ महापालिका माध्यमिक शाळांमधील दहावीच्या विद्यार्थ्यांच्या फायद्यासाठी हाती घेतलेल्या व्हर्चुअल क्लासरुम प्रकल्पासाठी रु.३ कोटी तरतूद प्रस्तावित.
- सर्व प्रकारच्या हिऱ्यांच्या आयातीवरील जकात उत्पन्नात वाढ करण्याच्या दृष्टीने, प्रक्रिया करण्यासाठी आयात करुन पुन्हा परदेशात निर्यात करण्यासाठी असलेली जकातीची सवलत रद्द करण्याचे आणि आयात केलेल्या हिऱ्यांवरील सध्याच्या २ टक्के (ॲड व्हलोरम) इतका जकातीचा दर कमी करुन तो ०.०१ टक्के (ॲड व्हलोरम) इतका करण्याचे प्रस्तावित. यामुळे अशा प्रकारच्या जकातीच्या सध्याच्या रु.२ कोटीच्या वार्षिक उत्पन्नात साधारणपणे वाढ होऊन ते रु.९ कोटी इतके होण्याचे अपेक्षित. ही दरकपात सुरुवातीला एका वर्षाच्या कालावधीसाठी लागू.

- टेहळणीच्या कामांमध्ये सुधारणा व्हावी याकरिता आणि सर्व मुख्य जकात नाक्यांवर व्यवहारांना लागणाऱ्या वेळेत घट व्हावी या दृष्टिकोनातून इन मोशन वे-ब्रिज, स्कॅनर्स, कॅमेरे आणि सी.सी.टी.व्ही. अशा प्रकारची आधुनिक साधनसामग्री बसविण्याचे प्रस्तावित. यासाठी सन २०११-१२च्या अर्थसंकल्पीय अंदाजात रु.१०० कोटीची तरतूद प्रस्तावित. तसेच प्रमुख जकात नाक्यांची दर्जोन्नती व आधुनिकीकरणासाठी रु.५४ कोटीची तरतूद प्रस्तावित.
- डांबरी रस्त्यांच्या सुधारणांची व सिमेंट काँक्रीटीकरणाची रु.१००० कोटी रकमेची कामे दोन टप्प्यात सुरु करण्याचे प्रस्तावित. याकरिता सन २०११-१२च्या अर्थसंकल्पीय अंदाजात रु.७२७.२४ कोटी एवढी तरतूद प्रस्तावित. ही कामे मे २०१२ पर्यंत पूर्ण होणार असल्याने या कामांसाठीची उर्वरित तरतूद सन २०१२-१३ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात प्रस्ताविली जाईल.
- पर्जन्य जलवाहिन्यांच्या सुधारणांच्या कामांसाठी सुधारित अंदाजात रु.११०० कोटी व सन २०११-१२च्या अर्थसंकल्पीय अंदाजात रु.१२४० कोटी एवढी भरीव तरतूद प्रस्तावित. ब्रिमस्टोवॅड प्रकल्पाअंतर्गत २३ प्रकल्प कामे सन २०११-१२ मध्ये पूर्ण केली जातील व याकरिता रु.६८०.२२ कोटी एवढा निधी उपलब्ध करुन दिला जाणार आहे. मार्च २०११ पर्यंत ब्रिमस्टोवॅड प्रकल्पाअंतर्गतची ४ प्रकल्प कामे पूर्ण करण्यात येतील. हाजी अली आणि इर्ला पंपिंग स्टेशनची कामे मे २०११ पर्यंत पूर्ण केली जातील. क्लिव्हलॅण्ड आणि लव्ह ग्रोव्ह पंपिंग स्टेशन्सच्या कामांना लवकरच सुरुवात. ब्रिटानिया आऊटफॉल आणि गझदरबंद पंपिंग स्टेशनची कामे सन २०११-१२ मध्ये सुरु केली जातील. सन २०११-१२ मध्ये या कामांसाठी रु.१२२.५० कोटी एवढी तरतूद प्रस्तावित. ही ४ कामे मे २०१२ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट.
- महापालिकेच्या संगणकीय प्रणालीकरिता डिझास्टर रिकव्हरी साईट विकसित केली जाणार. या प्रकल्पाकरिता रु.५ कोटीची तरतूद प्रस्तावित.
- आरोग्य क्षेत्रासाठी रु.२१६७.५१ कोटींची तरतूद सन २०१०-११ च्या सुधारित अंदाजांतील तरतुदीच्या तुलनेत २९.५७% इतकी वाढ.
- प्राथमिक स्तरावरील आरोग्य क्षेत्रात डॉक्टरांचे वैद्यकीय कौशल्य वाढविणे, रोग निदान मूलभूत सुविधांची दर्जोन्नती करणे आणि दवाखान्यांच्या दुरुस्त्या आणि त्यांना समान रुप देणे (Branding) या बाबी अंतर्भूत असलेल्या दवाखाने दर्जोन्नती कार्यक्रमासाठी रु.२५ कोटी.
- १६ उपनगरीय रुग्णालयांतील आरोग्य सेवांची दर्जोन्नती, दुरुस्त्या आणि Face Lift यासाठी रु.४९.५६ कोटींची तरतूद.

- महापालिकेच्या ४ अध्यापकीय रुग्णालयांतील विद्यमान पायाभूत सुविधांची दर्जोन्नती तसेच नवीन विभाग सुरु करणे आणि अत्याधुनिक साधनसामुग्री पुरविण्यासाठी रु.१२३.०२ कोटींची तरतूद.
- नागरिकांना तज्ञ डॉक्टरांच्या सेवा त्यांच्या घराजवळच्या उपनगरीय रुग्णालयात उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीकोनातून प्रमुख रुग्णालये व उपनगरीय रुग्णालये संलग्न करण्यासाठी लिंकेज सिस्टीमची सुरुवात.
- रुग्णालयांच्या पुनर्विकासासाठी एकूण रु.१६७ कोटी. त्यात कुपर रुग्णालय (रु.१०० कोटी), भगवती रुग्णालय (रु. १२ कोटी), शताब्दी कांदिवली (रु.५५ कोटी) यांचा समावेश.
- जोगेश्वरी येथे ट्रॉमा रुग्णालय उभारण्यासाठी रु.४० कोटी.
- मुंबई आरोग्य अभियानांतर्गत नवीन उपक्रम जसे लिव्हर ट्रान्सप्लांट कार्यक्रम, सर्वंकष ब्रेस्ट कॅन्सर केअर कार्यक्रम, मधुमेह आणि उच्च रक्तदाब यासारख्या लाईफस्टाईल डिसिझेससाठी विशेष दवाखाने. तसेच झोपडपट्टयांमध्ये मधुमेह आणि उच्च रक्तदाब तपासणी शिबीरे, उत्तम मानसिक आरोग्यासाठी विविध कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहेत.
- सार्वजनिक - खाजगी भागीदारी तत्वावर ६ नवीन डायलिसीस सेंटर्सची उभारण्याचे प्रस्तावित.
- माता आणि बाल संगोपन सेवा बळकट करण्यासाठी १८२ आरोग्य केंद्रांवर प्रसुतीपूर्व आणि प्रसुतीनंतरच्या सेवा तसेच तपासणीची सुरुवात.
- महापालिका मंडयांच्या व्यापक दुरुस्त्यांसाठी रु.८५.२० कोटींची तरतूद.
- खोताची वाडी, गिरगाव येथील मंडईत महिला बचत गटांसाठी बचत गट दालन.
- पूर्व द्रुतगती मार्गावर मुलूंड पासून अमर महल, चेंबूर पर्यंत ३००० मि.मी. व्यासाची जलवाहिनी टाकण्याचे काम मे २०११ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असून यामुळे एम/पूर्व, एम/पश्चिम, एफ/दक्षिण, एफ/उत्तर, बी आणि ई विभागातील पाणी पुरवठयात सुधारणा होईल. याकरिता रु.२१ कोटीची तरतूद तीन-अ पाणी पुरवठा प्रकल्पाच्या उर्वरित कामांसाठी सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात रु.७१.०७ कोटीची तरतूद प्रस्तावित.

- चार-मुंबई मध्य वैतरणा पाणी पुरवठा प्रकल्पातील (सर्व ६ घटक कामांसाठी) सर्व घटक कामे मे २०१२ पर्यंत पूर्ण होऊन जुलै २०१२ पर्यंत धरण संपूर्ण भरल्यानंतर मुंबईच्या पाणी पुरवठयात प्रतिदिनी ४५५ द.ल.लि. वाढ होईल. याकरिता रु.८८७.८७ कोटी तरतूद प्रस्तावित.
- मलबार हिल ते क्रॉस मैदान बोगद्याचे काम सप्टेंबर २०११ पर्यंत पूर्ण होऊन काळबादेवी, कुलाबा, कफ परेड आणि नरिमन पॉईंट विभागाच्या पाणी पुरवठयात सुधारणा होईल. याकरिता रु.४० कोटी तरतूद प्रस्तावित
- मरोशी ते रुपारेल कॉलेज बोगद्याचे काम ऑगस्ट २०१२ पर्यंत पूर्ण होऊन जी/दक्षिण, जी/उत्तर व एच/पूर्व या विभागातील पाणी पुरवठयात त्याचप्रमाणे मलबार टेकडी जलाशयातील पाणीसाठयात सुधारणा होईल. याकरिता रु.१४० कोटी तरतूद प्रस्तावित
- गुंदवली पासून भांडूप संकुलापर्यंत बोगद्याचे काम डिसेंबर २०१४ पर्यंत पूर्ण होऊन सध्या अस्तित्वात असलेल्या उच्चस्तर वैतरणा, मोडक सागर, तानसा यासारख्या स्त्रोतातून तसेच मध्य वैतरणा, गारगाई व पिंजाळ येथून उपलब्ध होणाऱ्या पाण्याचे वहन केले जाईल. याकरिता रु.२३० कोटी तरतूद प्रस्तावित
- दोन मृदू पोलादी तानसा जलवाहिन्या बदलण्याचे काम मे २०१३ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असून या कामासाठी रु.३११ कोटी.
- मुंबई शहरास सध्या प्रतिदिनी ३३५० द.ल.लि. पाणी पुरवठा होत आहे. सन २०६१ पर्यंतची २६ दशलक्ष एवढी लोकसंख्या लक्षात घेता ६१५२ द.ल.लि. पाण्याची मागणी असेल. ही मागणी भागविण्याकरिता भविष्यामध्ये गारगाई व पिंजाळ जल प्रकल्पांची जलद गतीने अंमलबजावणी केली जाईल.
- गारगाई प्रकल्पाचे काम मार्च २०१४ मध्ये सुरू होऊन जून २०१७ मध्ये पूर्ण होणे अपेक्षित आहे. या प्रकल्पाचा अंदाजित खर्च रु.२७०० कोटी असून या स्त्रोतापासून प्रतिदिनी ४४० द.ल.लि. अधिक पाणी उपलब्ध होईल.
- पिंजाळ प्रकल्पाचे काम ऑक्टोबर २०१४ मध्ये सुरू होऊन मार्च २०२१ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. या स्त्रोतामुळे ८६५ द.ल.लि. अधिक पाण्याची वाढ होईल. दमणगंगा व पिंजाळ नदी जोडण्याच्या प्रकल्पाचे काम प्रस्ताविले आहे.
- जल वितरण व्यवस्थेचे जाळे बळकट करण्यासाठी १२६ कि.मी. लांबीच्या जल वितरण वाहिन्या टाकण्याचे काम प्रगतीपथावर असून सन २०११-१२ मध्ये रु.२२१.६७ कोटी खर्चाच्या १३० कि.मी. लांबीच्या जलवाहिन्या टाकण्यात येतील.

- ४० कि.मी. लांबीच्या जुन्या व गंजलेल्या जलवाहिन्यांची पुनर्स्थापना व पुनर्वसन करण्यासाठी रु.२२.४० कोटी.

- महसूल न मिळणाऱ्या पाण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी शहर विभागातील (डी व एफ/दक्षिण विभाग) व पश्चिम उपनगरातील (पी/दक्षिण, पी/उत्तर व आर/दक्षिण विभाग) उप परिमंडळात रु.१०.०५ कोटी खर्चाचा गळती अन्वेषण पथदर्शी प्रकल्प हाती घेतला आहे. या प्रकल्पात ग्राहकांना जलमापके व फ्लो मीटर्स पुरविणे, बेहिशोबी पाणी, गळती शोध व दुरुस्ती या बाबींचा अंतर्भाव आहे.

- जलदेयकांची परिणामकारक व कार्यक्षमपणे वसूली होण्यासाठी ग्राहकांकडील सध्याच्या जलमापकाऐवजी स्वयंचलित जलमापके बसविण्यासाठी रु.१९० कोटी, परिमंडळनिहाय पाण्याचा वापर व शिल्लक पाण्याचा अभ्यास करुन फ्लो मीटर्स बसविण्यासाठी रु.१०.६० कोटी.

- जलवाहिन्यांवरील झोपडपट्टीधारकांचे (प्रकल्पबाधितांचे) पुनर्वसन करण्यासाठी रु.८६ कोटी.

- घाटकोपर सांडपाणी प्रक्रिया केंद्र येथे DBOOT (संकल्पचित्रे, बांधा, वापरा, मालकी व हस्तांतर) तत्वावर १५० द.ल.लि. क्षमतेचे सांडपाण्यावर प्रक्रिया व पुनर्वापर करण्याचे केंद्र प्रस्ताविले असून यामुळे पिण्याव्यतिरिक्त अन्य कारणांसाठी वापरावयाच्या पाण्याची मोठ्या प्रमाणावर बचत होईल. यासाठी रु.१ कोटी.

- मलजलावर प्रक्रिया करण्याच्या सुविधेत प्राथमिक व दुय्यम स्तरावर सुधारणा करुन स्वच्छ पर्यावरणाचा दर्जा राखणे व जैविक मलातून विद्युतनिर्मिती करुन उर्जेच्या खर्चात बचत करण्यासाठी रु.३९ कोटी. ७ ठिकाणांपैकी एका ठिकाणी काम सुरु होणे अपेक्षित आहे.

- मुंबई मलनि:सारण प्रकल्प (टप्पा-२) मध्ये मलनि:सारण सुविधा क्षेत्र सन २०१२ च्या सुमारास म्हणजे घटक-१ ची कामे पूर्ण झाल्यानंतर ६०% वरुन ८०% पर्यंत वाढेल. एकूण १८.४१ कि.मी. मलनि:सारण वाहिन्यांपैकी आतापर्यंत ८.०८ कि.मी. लांबीच्या मलनि:सारण वाहिन्या सूक्ष्म बोगदा पध्द्तीने टाकण्यात आल्या असून उर्वरित कामे मार्च २०१२ पर्यंत पूर्ण होतील. तसेच १७.७ कि.मी. लांबीच्या मलनि:सारण वाहिन्यांची बर्स्टिंग पध्दतीने दर्जोन्नती करणे यासाठी रु.१३४.५८ कोटी.

- वस्ती स्वच्छता कार्यक्रमांतर्गत ३५००० शौचकूपांची कमतरता भरुन काढण्यासाठी पुढील वर्षी २५०० शौचकुपे बांधण्याचे उद्दीष्ट असून यासाठी रु.२२ कोटी.

- देवनार क्षेपणभूमी शास्त्रोक्त पध्दतीने बंदर करणे, कांजूरमार्ग येथे नवीन क्षेपणभूमीची उभारणी, देवनार, कांजूरमार्ग आणि मुलुंड येथे सार्वजनिक खाजगी भागीदारी अंतर्गत कचरा प्रक्रिया केंद्र (वेस्ट प्रोसेसिंग प्लान्ट) उभारण्याच्या भांडवली कामांसाठी रु.१३१ कोटींची तरतूद प्रस्तावित,
- घन कचऱ्याचे संकलन व परिवहनाकरिता १० स्टेशनरी कॉम्पॅक्टर्सची खरेदी. त्याकरिता रु.७ कोटीची तरतूद प्रस्तावित.
- मुंबई अग्निशमन दलाची अग्निशमन क्षमता वाढविण्याकरिता २३ फायर इंजिन्स, ५ रेस्क्यू व्हॅन्स, ३५ थर्मल इमेजिंग कॅमेरे, १० पोर्टेबल पंप्स् आणि बीच सेफ्टी उपकरणाचे ६ संच यांची खरेदी प्रस्तावित व त्याकरिता सन २०१०-११ च्या सुधारित अंदाजात रु.६०.२९ कोटी आणि सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात रु.७०.३० कोटीची तरतूद प्रस्तावित.
- २४ विभागीय नागरी सुविधा केंद्रामार्फत दिल्या जााणाऱ्या सेवा सिफी आयवे, ईटझ कॅशच्या अंदाजे ५०० केंद्राद्वारे नागरिकांना सेवा देण्यासाठी उपलब्ध होतील.
- शारिरिकदृष्टया अपंग मागासवर्गीय लोकांना कृत्रिम अवयव पुरविण्यासाठी रु.३ कोटी, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यासाठी रु.१.२० कोटी आणि उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना व्यावसायिक आणि तांत्रिक पाठयक्रमांसाठी शिष्यवृत्ती देण्यासाठी रु.२.४० कोटीची तरतूद प्रस्तावित.
- महिलांच्या सक्षमीकरणाकरिता विविध योजनांकरिता रु.१५ कोटीची तरतूद प्रस्तावित.
- थीम गार्डनचा विकास, विद्यमान उद्यानांचे व मोकळया जागांची दर्जोन्नती तसेच नवीन उद्याने विकसित करणे याकरिता रु.५५.६७ कोटीची तरतूद प्रस्तावित.
- विद्यमान वृक्षांचे परिरक्षण व नवीन वृक्षांची लागवड व हरित वृध्दीकरिता रु.२४.५० कोटीची तरतूद प्रस्तावित.
- स्वच्छता मोहिमेअंतर्गत दत्तक वस्ती योजना, स्वच्छ परिसर योजना, मॅनिंग व मॉपिंग योजना, समुद्रकिनारे स्वच्छ करणे तसेच कचरा गोळा करणे इत्यादीसाठी रु.२७९.२० कोटी तरतूद प्रस्तावित.